**निवेदन**
आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे.
करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!
संपर्क : ७२७६८७१००८

साप्ताहिक

# संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013

■ वर्ष : १३ वे ■ अंक : ५२ वा ■ सोमवार दि. २० जूलै ते २६ जूलै २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने - ०४

वांगचुक यांना हटविले... पान २ वर | सच्चा गांधीवादी, समाजवादी... पान ३ वर | विद्यापीठांनी शिक्षणासह... पान ४ वर

# आयुक्तांनी आणि अतिरिक्त आयुक्तासह माध्यमांनी अशित जाधव यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले पण नियतीने विजेंद्र पवारला समोर आणले

## बदली आणि मेसेज यांची सविस्तर चौकशी केल्यास अधीक्षक अभियंता अशित जाधव यांना पुन्हा घ्यावेच लागेल



**पुणे :** श्री.अशित वेदप्रकाश जाधव अधीक्षक अभियंता पाणीपुरवठा विभाग पुणे महानगरपालिका यांना मनपा सेवेतून निलंबित करण्याचा आदेश शनिवारी रात्री काढण्यात आला आणि रविवारी आणि सोमवारी या आदेशाने पुणे महानगरपालिकेमध्ये मोठ्या प्रमाणावर खळबळ झाली. आणि माध्यमांनी तर याला मोठ्या प्रमाणात हवा दिल्याने पुणे महापालिकेचे अधीक्षक अभियंता अशित जाधव यांच्यावर विविध आरोप करून त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. पण नियतीने असा प्रसंग आणून ठेवला की, आयुक्तांना केलेल्या मेसेजमध्ये ज्या त्रयस्थ व्यक्तीचे नाव दिले होते. तो व्यक्ती विजेंद्र हनुमंत पवार (वय ३५, रा.शिवाजीनगर) याला फसवणूक केल्याप्रकरणी अटक करण्यात आली. आता चौकशीमध्ये कोणाकोणाचा विश्वास संपादन करून फसवणूक केली हे सत्य समोर येणार आहे. हे मात्र नक्की.

अधीक्षक अभियंता अशित जाधव यांनी थेट महापालिका आयुक्तांनाच बदली रद्द करण्यासाठीचा रेट विचारणारा मेसेज व्हॉट्सॲपवर पाठवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने त्यांना तातडीने निलंबित केले असून, त्याच्याविरूध्द खातेनिहाय चौकशी करण्याचे आदेश अतिरिक्त महापालिका आयुक्त प्रजित नायर यांनी दिले आहेत. निलंबन आदेशात कारवाईचे नेमके कारण नमूद करण्यात आलेले नसले, तरी बदली रद्द करण्यासाठी आयुक्तांना पाठवलेल्या मेसेजमुळेच ही कारवाई झाल्याची चर्चा प्रशासनात रंगली आहे.

अतिरिक्त आयुक्त नायर यांनी शनिवारी रात्री उशिरा निलंबनाचा आदेश जारी केला. आदेशानुसार, ११ जुलै रोजी घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५६(२) (फ) अंतर्गत जाधव यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. मात्र, आदेशात त्या दिवशी नेमकी कोणती घटना घडली किंवा आयुक्तांना पाठविलेल्या मेसेजचा मजकूर काय होता, याचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. तसे पाहता नियमित प्रशासकीय बदल्यांमध्ये दि.१३/१२/२०२४ ला अशित जाधव यांची (पान ३ वर)

### फसवणुक झालेल्यांनी पुढे यावे असे आवाहन पोलिसांनी करावे

पुणे महापालिकेचे उपायुक्त रवी पवार यांचा पुतण्या असल्याचे खोटे सांगून मिळकत कर कमी करून देण्याचे आमिष दाखवत थकबाकीदाराची ६ लाख रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी विजेंद्र हनुमंत पवार याला अटक केली आहे. तसेच निलंबित अशित जाधव मेसेज प्रकरणाशीही या विजेंद्र हनुमंत पवार याचा काय संबंध असू शकतो. हे जवळ-जवळ स्पष्ट होताना दिसत आहे? तरी पोलिसांनी इतर कोणाचीही फसवणूक झाल्यास ताबडतोब संपर्क करावा व सर्व प्रकरण गोपीनीय ठेवण्यात येईल असे जाहीर आवाहन केल्यास पुणे महापालिकेतील अनेक विविध विभागातील सेवक आणि अधिकारी हे पुढे येतील?

### बदली करण्यामागे नक्की काय कारण?

पथ विभागामध्ये १ वर्ष ५ महिने ५ दिवस काम केले आहे. सेवानिवृत्तीला १ वर्ष ३ महिने १३ दिवस बाकी आहेत. शासनाच्या नियमानुसार ३ वर्षांनी बदली होण्याच्या अगोदरच ते सेवानिवृत्त होणार आहेत. मग त्यांना पथ विभागामधून १ वर्ष ५ महिने ५ दिवसामध्येच बदली करण्यामागे नक्की काय घटना घडली हा एक संशोधनाचा भाग आहे?

# ठराविक ठेकेदारांना फायदा पोहोचवण्यासाठी निविदा मंजूर केल्या जात असल्यामुळे पुणेकरांच्या कराच्या पैशांची व मनपाची फसवणूक होत आहे - ॲड.निलेश निकम, विरोधी पक्षनेता








**पुणे :** ओला व सुका कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणीच्या निविदा प्रक्रियेतील अनियमिततेबाबत ॲड.निलेश निकम विरोधी पक्षनेता पुणे महानगरपालिका यांनी पुणे महापालिका आयुक्त यांना दि.१७/७/२०२६ रोजी जाब विचारला आहे. ते म्हणतात की, पुणे शहरता घरगुती, हॉटेल व इतर माध्यमांतून दररोज सुमारे १५०० ते १६०० टन सुका कचरा आणि १००० ते ११०० टन ओला कचरा निर्माण होतो, अशी मनपाची अधिकृत धारणा आहे. solid waste management (SWM) rules २०१६, २०२२ व २०२६ नुसार या संपूर्ण कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे मनपावर बंधनकारक आहे. सद्यस्थितीत, पुणे मनपाने आतापर्यंत २३०० ते २४०० टन क्षमतेच्या सुका कचरा प्रक्रिया प्रकल्पांना मान्यता देऊन ते कार्यान्वित केले आहेत. तसेच ६०० ते ८०० टन क्षमतेचे ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित असल्याचे समजते. उर्वरित जवळपास ५०० टन ओला कचरा हा शहराबाहेर शेतकऱ्यांना खत म्हणून पाठवला जात आहे.

असे असतानाही, मनपाने नवीन ३०० टन ओला +२०० टन सुका कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी नवीन निविदा मागवली आहे. वास्तविक पाहता, ओला व सुका कचरा प्रक्रियेचे दर परस्पर भिन्न असताना, दोन्ही एकत्र करून अशा प्रकारे निविदा काढणे तांत्रिकदृष्ट्या पुर्णपणे चुकीचे आहे. या निविदेमध्ये निकोप स्पर्धा होणार नाही आणि केवळ काही ठराविक ठेकेदारच पात्र होतील अशी रचना केल्याचे दिसते. परिणामी, भूमी ग्रीन या कंपनीला अत्यंत अवास्तव व चढ्या दराने ही निविदा मिळाली. असून, यामुळे मनपाचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. तसेच, शहराच्या हद्दीबाहेर शासनाकडून मिळालेल्या निधीचा वापर करून अजून एक ३०० टनाची निविदा मनपाने प्रस्तावित केली आहे.

शहरात सध्या १५०० ते १६०० टन सुका कचरा निर्माण होत असताना आणि मनपाकडे आधीच २१०० ते २४०० टन क्षमतेचे सुका कचरा प्रकल्प जागेवर उपलब्ध असताना, नवीन २०० टन सुक्या कचऱ्याच्या प्रकल्पाची निविदा काढण्याचे प्रयोजन काय, हा मोठा प्रश्न आहे. जर जुने प्रकल्प त्यांच्या मंजूर क्षमतेपेक्षा कमी क्षमतेने चालत असतील, तर त्या ठेकेदारांवर मनपाने आतापर्यंत काय दंडात्मक कारवाई केली आणि प्रकल्पनिहाय किती दंड वसूल केला, याची सविस्तर माहिती प्रशासनाने जाहीर (पान ३ वर)

# संपादकीय...

## वांगचुक यांना हटवले असले तरी आंदोलन सुरूच राहील

देशातील प्रसिद्ध संशोधक आणि पर्यावरण अभ्यासक सोनम वांगचुक यांच्या आमरण उपोषणादरम्यान घडलेल्या घटनांमुळे देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. आंदोलनकर्त्यांचा आरोप आहे की, सरकारने संवाद न साधता त्यांना बळजबरीने रुग्णालयात दाखल केले. या घटनेनंतर जंतरमंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचे वृत्त समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केंद्र सरकारवर टीका करत सरकार आंदोलनाला घाबरलं आहे अशी भूमिका मांडली.

दिल्लीतील जंतरमंतर येथे गेल्या २१ दिवसांपासून बेमुदत उपोषण करत असलेले सामाजिक व पर्यावरण क्षेत्रातील कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना जंतरमंतर येथे सकाळी सुमारे ७ वाजता नाट्यमय घडामोडी घडल्या, संसद भवनापासून अवघ्या २-३ किलोमीटर अंतरावर असलेल्या आंदोलनस्थळी मोठ्या संख्येने पोलीस कर्मचारी दाखल झाले. त्यापैकी अनेक जण साध्या वेशात होते. पोलिसांनी धक्काबुक्की करत मंचावर धाव घेतली.

त्याचबरोबर निमलष्करी दलाच्या जवानांनी मंचाभोवती घेराव घातला होता, पोलिसांनी पांढऱ्या चादरींचा पडदा उभा केला आणि त्यांनी वांगचुक यांना तेथून हलवले. त्यावेळी गोंधळ सुरू झाला होता. काही आंदोलक पोलिसांशी झटापट करत होते. पण पोलिसांनी वांगचुक यांना उचलून नेले. एका चादरीतून रूग्णवाहिकेत ठेवले व त्यांना सफदरजंग रूग्णालयात हलविण्यात आले. मात्र तिथे त्यांनी आयव्ही फ्लुइड, तोंडावाटे द्रवपदार्थ आणि इतर औषधे घेण्यास नकार दिला आहे.

नीट-युजीसह विविध परीक्षांतील झालेले गैरप्रकार, त्यानंतर विद्यार्थ्यांचे झालेले मृत्यू या गोष्टींच्या निषेधार्थ बेमुदत उपोषण करत आहेत. त्यामुळे निर्जलीकरण आणि शरीरातील चयापचयाशी संबंधित बदलांची लक्षणे आढळल्यानंतरही वांगचुक यांनी घेण्यास नकार दिला. त्यामुळे आरोग्याच्या हितासाठी उपचार घेण्याकरिता डॉक्टर त्यांचे समुपदेशन करत आहेत. त्यांना दिल्ली पोलिसांनी सकाळी ७.४० वाजता रूग्णालयात दाखल केले. माझ्या संमतीशिवाय सोनम यांच्यावर कोणतेही उपचार करू नयेत तसेच वैद्यकीय अहवालांची प्रत द्यावी, अशी मागणी त्यांच्या पत्नी गीतांजली जे.आंगमो यांनी केली आहे. सफदरजंग रूग्णालयात उपचारांबाबत पारदर्शकता नसल्याने सोनम यांना अन्य रूग्णालयात हलवावे असे त्या म्हणाल्या.

२० दिवस अन्नत्याग केल्याने त्यांना अशक्तपणा जाणवत आहे. वांगचुक यांना पोलिसांनी रूग्णालयात नेल्यानंतर कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी जंतरमंतरवर बेमुदत उपोषण सुरू केले. त्यांच्यावर एका महिलेने शाईफेक करण्याचा प्रयत्न केला. तिला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पर्यावरण आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना शांततापुर्ण उपोषण सुरू असताना जंतर-मंतरवरून हटविण्याची कारवाई चुकीची असल्याचे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शनिवारी म्हटले. तसेच केंद्र सरकारचा मूलमंत्र असत्य आणि हिंसा असल्याचा आरोप त्यांनी केला. वांगचुक यांना जंतर-मंतरवरून रूग्णालयात हलविण्याच्या दिल्ली पोलिसांच्या कारवाईवर काँग्रेसने तीव्र टीका करत, ही घटना देशाच्या लोकशाही आणि संविधानावरील आणखी एक काळा डाग असल्याचे म्हटले आहे.

वांगचुक यांच्या समर्थनार्थ अमेरिकेतील काही मानवाधिकार संघटनांनी वॉशिंग्टन येथे एकत्र येत पाठिंबा व्यक्त केला. हिंदूज फॉर ह्युमन राइट्स आणि आझादी प्रोजेक्ट या संघटनांनी भारतीय दुतावासाजवळील म.गांधी यांच्या पुतळ्यासमोर निदर्शने केली.

दिल्लीचे नवे पोलिस आयुक्त अनुराग कुमार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या २४ तासांत ही पहिली मोठी कारवाई केली.

दिल्ली पोलिसांच्या सोनम वांगचुक यांच्यावरील कारवाईचा भाकप, माकपसह डाव्या पक्षांनी तीव्र निषेध केला. परीक्षेतील गैरप्रकारांवर उत्तर देण्याऐवजी सरकार लोकशाही पध्दतीने व्यक्त होणारा विरोध दडपण्याचे काम करत असल्याचा आरोप त्यांनी केला. वांगचुक यांना हटवले असले तरी आंदोलन सुरूच राहील, असा निर्धार सर्व डाव्या संघटनांनी व्यक्त केला.


साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक - यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग - सी - २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे - ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

**आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात**
Email : sangharshachaaawaz22@gmail.com
Email : sangharshachaaawaz@rediffmail.com
Mob. : 7276871008 / 9665487134



**मागील अंकावरून**

नाही कारण तो तिाा तो योग्यप्रकारे उदरनिर्वाह करू शकत नाही.

ड) हे तरूण गृहस्था, हे सहा दुष्परिणाम आळसी लोकामध्ये असतात, तो कोणतेही काम करित नाही. तो काम न करण्याची अशी कारणे देतो.

१) आज खूप थंडी आहे.

२) आज अत्यंत उष्णता आहे.

३) आज रात्र झालीय, खूप उशिर झाला आहे.

४) सूर्य उक्षवायला बराच अवधी आहे खूपच लवकर का उठावे.

# सिगोलवाद सुत्त

मला उपलब्ध वाङमयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.

जयभीम!

**उत्तमराव सोनवणे**

५) मला आता बरीच अवधी आहे खूपच लवकर का उठावे.

६) अधिक जेवल्यामुळे थोडी वामकुक्षी घ्यावी.

अशा प्रकारे अनेक कारणे सांगून तो कोणतेही काम करित नाही. नविन धन मिळवित नाही. अशामुळे जी धूसंपत्ती आहे ती तो हळू हळू घालवून बसतो.

भगवान बुध्दांनी हे सांगितल्यावर ते पुन्हा म्हणाले कांही खाण्यापिण्याचे दोस्त असतात जो पर्यंत तुझ्याकडून कांही तरी मिळते तोपर्यंतच तुला तुझ्यासमोर मित्र म्हणतील; ते सर्व लाभार्थी आहेत.

सूर्योदयापर्यंत झोपणे, पती अुवा पत्नीचा विश्वासघात करणे, रागीट स्वभाव, दुसऱ्याचे नुकसान करण्याची इच्छा धरणारे, वाईट मित्र, सोबती ही सहा कारणे मनुष्याच्या सत्यानाशास **क्रमश:**

## गणना अर्जांच्या डिजिटायझेशनमध्ये राजकीय पक्षांनी सक्रिय भूमिका घ्यावी - जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी

**पुणे :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमात प्रशासनाकडून सर्वतोपरी खबरदारी घेतली जात असून याद्या अचूक व परिपूर्ण तयार करण्यासाठी राजकीय पक्षांनीही सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले. विशेषतः गणना अर्जांच्या डिजिटायझेशनचा टप्पा अत्यंत महत्त्वाचा असून या प्रक्रियेत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी प्रभावी योगदान द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित राजकीय पक्षांच्या साप्ताहिक बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, तहसीलदार शीतल मुळे तसेच विविध राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष, शहर प्रमुख, सचिव आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.डूडी यांनी सांगितले की, विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यास दोन सहाय्यक नियुक्त करण्यात आले असून जिल्ह्यात एकूण १२ हजार ६३१ सहाय्यक कार्यरत आहेत. आतापर्यंत ५५ टक्के मॅपिंगचे काम पूर्ण झाले असून ५३ टक्के गणना अर्जांचे वितरण करण्यात आले आहे.

ते पुढे म्हणाले, या संपूर्ण प्रक्रियेतील सर्वाधिक महत्त्वाचा टप्पा म्हणजे अर्जांचे डिजिटायझेशन जास्तीत जास्त मतदारांचे अर्ज वेळेत डिजिटाईज होण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींनी आठवड्यातून किमान एक दिवस बीएलओकडील याद्यांची पडताळणी करावी. पात्र मतदाराचे नाव कोणत्याही परिस्थितीत यादीतून वगळले जाणार नाही, यासाठी दक्षता घेणे आवश्यक आहे. ज्या मतदारांपर्यंत गणना अर्ज पोहोचणार नाही किंवा अर्ज जमा होणार नाही, त्यांचे नाव यादीतून वगळले जाण्याची शक्यता असल्याने प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचून अर्ज भरून घेणे आणि ते डिजिटायझेशनसाठी उपलब्ध करून देण्यात राजकीय पक्षांनी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले.

शहरी भागात डिजिटायझेशनचे काम अधिक गतीने पूर्ण करण्यासाठी विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगत त्यांनी यापुढे राजकीय पक्षांची साप्ताहिक बैठक दर बुधवारीऐवजी दर सोमवारी दुपारी २ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात येईल, अशी माहिती दिली.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघात डिजिटायझेशनच्या कामासाठी ४५० विद्यार्थी मदत करणार असल्याचे सांगितले. इतर मतदारसंघांतील विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

## घरच्या किचनमधून उद्योजकतेकडे वाटचाल; अमृततर्फे २१ व २२ जुलै रोजी 'अन्नपूर्णा क्लाउड किचन' प्रशिक्षण

**पुणे :** घरगुती स्वयंपाक कौशल्याला व्यवसायाचे स्वरूप देऊन महिलांसह युवक-युवतींना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने अमृत (academy of Maharashtra Research, Upliftment and Training) संस्थेतर्फे २१ व २२ जुलै २०२६ रोजी पुण्यात 'अमृत अन्नपूर्णा क्लाउड किचन ट्रेनिंग प्रोग्राम' आयोजित करण्यात आला आहे.

ऑनलाइन फूड डिलिव्हरी सेवांचा वाढता वापर आणि घरगुती खाद्यपदार्थांना मिळणारा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कमी गुंतवणुकीत स्वतःचा व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या गृहिणी, युवक-युवती तसेच नवउद्योजकांसाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे.

दोन दिवसांच्या प्रशिक्षणात क्लाउड किचन व्यवसाय सुरू करण्यापासून ते यशस्वीपणे चालविण्यापर्यंतच्या विविध बाबींवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यामध्ये एफएसएसएआय (FSSAI) नोंदणी व परवाना प्रक्रिया, Swiggy आणि Zomato वर व्यवसायाची नोंदणी, मेनू नियोजन, पॅकेजिंग, ब्रँडिंग, मार्केटिंग, ग्राहक व्यवस्थापन आदी विषयांचा समावेश असून प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या सहभागींना प्रमाणपत्रही प्रदान करण्यात येणार आहे.

महिलांच्या उद्योजकतेला चालना देणे, युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि घरगुती उद्योगांना प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे अमृत संस्थेने कळविले आहे. प्रशिक्षणाद्वारे व्यवसाय संकल्पनेपासून प्रत्यक्ष विक्रीपर्यंतचा प्रवास सुलभ करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे.

प्रशिक्षणासाठी प्रवेश मर्यादित असून 'प्रथम नोंदणी करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर सहभागींची निवड करण्यात येणार आहे. इच्छुकांनी लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हा व्यवस्थापक सिद्धेश केसकर (मो. ९३५९४०३८९१) किंवा अमृत पुणे जिल्हा कार्यालय (मो. ९११२२२८७६७) येथे संपर्क साधावा. तसेच नोंदणीची सुविधा अमृतच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# सच्चा गांधीवादी, समाजवादी 'सप्तर्षी' निखळला – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

## डॉ.कुमार सप्तर्षी यांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची श्रद्धांजली

**पुणे :** ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, गांधीवादी नेते, लेखक आणि तरुण पिढीचे मार्गदर्शक डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनामुळे सच्चा गांधीवादी व समाजवादी 'सप्तर्षी' निखळला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.



उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, डॉ. कुमार सप्तर्षी यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातील वंचित, शोषित घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि गांधीवादी विचारांच्या प्रसारासाठी समर्पित केले. युवक क्रांती दलाच्या (युक्रांद) माध्यमातून त्यांनी तरुणांमध्ये एक नवी ऊर्जा आणि सामाजिक जाणीव निर्माण केली. डॉ. सप्तर्षी हे अच्युतराव पटवर्धन एस.एम.जोशी, ना.ग.गोरे यांच्या समाजवादी परंपरेत वाढले. महात्मा गांधी आणि जयप्रकाश नारायण यांच्या विचारांचे ते आयुष्यभर कट्टर अनुयायी राहिले. विविध आंदोलनांमध्ये त्यांच्या सक्रिय सहभागाने त्यांना ' सत्याग्रही ' म्हणून ओळख लाभली.

त्या पुढे म्हणाल्या की, डॉ. सप्तर्षी यांच्या लेखनाने आणि भाषणांनी अनेकांना प्रेरित केले. त्यांच्या सामाजिक बांधिलकी आणि साधेपणाने ते सर्वांचे आदर्श होते. लोकशाही मूल्यांचा आग्रह धरत असतानाच सामाजिक न्यायाच्या लढ्यातही ते कायम अग्रेसर असत. विधानपरिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी सभागृहात उमटवलेली छाप आणि सामाजिक कार्यकर्ता म्हणून रस्त्यावर केलेला संघर्ष कायम स्मरणात राहील. डॉ. सप्तर्षी यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# आयुक्तांनी आणि अतिरिक्त आयुक्तासह माध्यमांनी अशित जाधव यांना...

**(पान १ वरून)** करणे आवश्यक आहे. मूळ प्रकल्पांची पथ विभागात बदली करण्यात आली होती. आणि ते दि.३१/८/२०२७ ला सेवानिवृत्त होत आहेत. यामध्ये त्यांचा कार्यकाळ हा २ वर्ष ८ महिने १८ दिवसाचा होत आहे. यामध्ये ३ वर्षही होत नाही. मग त्यांना दि.१८/५/२०२६ रोजी अचानक बदलीचा आदेश काढून पाणीपुरवठा विभाग दिला जातो. मुळात ते पथ विभागामध्ये १ वर्ष ५ महिने ५ दिवस काम केले आहे. शासनाच्या नियमानुसार ३ वर्षांनी बदली होण्याच्या अगोदरच ते सेवानिवृत्त होणार आहेत. मग त्यांना पथ विभागामधून १ वर्ष ५ महिने ५ दिवसामध्येच बदली करण्यामागे नक्की काय घटना घडली हा एक संशोधनाचा भाग आहे? राहिला प्रश्न अधीक्षक अभियंता अशित जाधव यांनी केलेल्या मेसेजचा तर संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ज्यावेळेस आयुक्तांनी चुकीचा वाटलेला मेसेज हा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या ग्रुपमध्ये पाठविला असे म्हण्तात आणि याच ग्रुपमध्ये सर्व अतिरिक्त आयुक्तही आहेत. त्यातील अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी त्वरित संबंधित अधीक्षक अभियंता अशित जाधव यांना बोलवून सविस्तर मेसेजवर चर्चा केली असती तर विजेंद्र पवार याची यामध्ये काय भूमिका आहे हे स्पष्ट झाले असते. आणि त्याचवेळेसच विजेंद्र पवार यांच्यावर गुन्हा दाखल झाला असता. पण अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी या गंभीर विषयात नेमके काय म्हणायचे आहे. हे न विचारता साधा खुलासाही मागितला नाही. आणि निम्या रात्री निलंबनाचा आदेश काढण्यात आला. पण म्हणतात ना सत्य बाहेर आल्याशिवाय राहत नाही. असा प्रसंग या बदली आणि मेसेजमध्ये दडलेला आहे. याची सविस्तर चौकशी झाल्यास व्यवस्थाच उघडी पडू नये म्हणजे झाले. कारण अशित वेदप्रकाश जाधव हे दि.८/११/१९९८ ला पुणे महापालिकेत रूजू झाले. १९९८ ते २००३ कनिष्ठ अभियंता म्हणून पाणीपुरवठा विभागात होते. त्यानंतर २००३ ते २००४ दुय्यम अभियंता म्हणून पाणीपुरवठा विभागातच होते. २००४ ते २००६ पाणीपुरवठा प्रत्यक्ष काम बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय, २००६ ते २००९ सहाय्यक अभियंता म्हणून विकास योजना येथे काम केले आहे. २००९ ते २०१० ढोलेपाटील क्षेत्रीय कार्यालय येथे काम केले आहे. दि.१७/१/२०११ पासून दि.१/४/२०११ या कालावधीत ते निलंबित होते. त्यानंतर त्यांना दि.२/४/२०११ ते ६/९/२०११ उपअभियंता अतिक्रमण विभाग असे करत दि.५/१२/२०११ ते दि.१४/६/२०१५ कार्यकारी अभियंता म्हणून उपायुक्त गवनी, प्रत्यक्ष काम पाणीपुरवठा येथे केले. दि.१५/६/२०१५ ते दि.१४/३/२०२३ पुन्हा पाणीपुरवठा विभाग, दि.१५/३/२०२३ ते दि.१२/१२/२०२४ अतिक्रमण अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग येथे काम केले. यानंतर दि.१३/१२/२०२४ ते दि.१८/५/२०२६ अधीक्षक अभियंता म्हणून पथ विभागात काम केले. आणि सेवानिवृत्तीला १ वर्ष १ महिना १२ दिवस असताना पुन्हा पाणीपुरवठा विभागात देण्यात आले. त्यांनी  अधीक्षक अभियंता म्हणून आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धा जानेवारी २०२६ रोजी पथ विभाग मधून केलेल्या कामात सहभाग घेतला. यांनी सलग १३ वर्षे पाणीपुरवठा विभागात काम केले आहे.

सध्या दि.१२/६/२०२६ पासून ते निलंबित आहेत. यासाठी सर्वस्व जबाबदार फसवणूक करणारा विजेंद्र हनुमंत पवार हा आहे. चौकशीमध्ये सत्य बाहेर येईलच तोपर्यंतचा काळ अशित जाधव यांना मानसिक त्रासामध्ये जाणार पण न्याय मिळणार हे नक्की.

# ठराविक ठेकेदारांना फायदा पोहोचवण्यासाठी निविदा मंजूर केल्या जात...

**(पान १ वरून)** क्षमता पूर्ण वापरली जात नसताना नवीन प्रकल्पांना मंजुरी देणे संशयास्पद आहे.

यासोबतच SWM नियमांनुसार ७५ पेक्ष अधिक सदनिका असलेल्या सोसायट्या, दररोज १०० किलोपेक्षा जास्त कचरा निर्माण करणाऱ्या गृहनिर्माण संस्था, मोठी व्यावसायिक एस्टॅब्लिशमेंट, शैक्षणिक संस्था आणि आयटी पार्क्स यांनी स्वत:चा ओला व इलेक्ट्रॉनिक्स कचरा स्वत:च्या आवारात जिरवणे बंधनकारक आहे. परंतु, पुणे मनपा हद्दीत अशा किती संस्था आहेत. त्यापैकी किती जणांनी प्रकल्प उभारले, किती प्रकल्पांना मालमत्ता कर सवलत दिली आणि सध्या किती प्रकल्प बंद आहेत. याचा कोणताही ठोस डेटा उपलब्ध नाही. अनेक ठिकाणी हे संस्थांतर्गत प्रकल्प मुद्दाम बंद ठेवून, तिथला कचरा खासगी ठेकेदारांमार्फत बेकायदेशीरपणे मनपाच्या रॅम्पवर आणून टाकला जातो आणि त्यामुळे प्रक्रिया करण्याचा अतिरिक्त आर्थिक भुर्दंड मनपावर पडत आहे. अशा खासगी ठेकेदारांवर काय कारवाई केली?

अगोदरचे प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालत नसताना आणि नियमांनुसार मोठ्या संस्थांना स्वत:चा कचरा हाताळण्याची जबाबदारी असताना, मनपा प्रशासन मुद्दामहून याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसते. काही ठराविक ठेकेदारांना फायदा पोहोचवण्यासाठी विशिष्ट अटी टाकून चढ्या दराने निविदा मंजूर केल्या जात आहेत. ज्यामुळे पुणेकरांच्या कराच्या पैशांची व मनपाची फसवणूक होत आहे. त्यामुळे आमची प्रशासनाकडे नम्र विनंती आहे की, कमी क्षमतेने प्रकल्प चालवून फसवणूक करणाऱ्या ठेकेदारांवर तात्काळ भक्कम दंड आकारून काम करून घ्यावे, तसेच गृहनिर्माण संस्था व आयटी पार्क्समधील बंद प्रकल्प सुरू करण्यासाठी कठोर पावले उचलावीत.

भूमी ग्रीन या कंपनीने पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या १०० में टन कचरा विल्हेवाटीच्या निविदेची पूर्णपणे वाट लावलेली आहे. पुणे महानगरपालिका कडील त्यांचा कोणताही प्रकल्प अद्याप पूर्ण क्षमतेप्रमाणे सुरू नाही. निविदा प्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या पूर्ण होण्यासाठी अँटोनी लारा कंपनीची दुसरी निविदा फक्त स्पर्धा दाखवण्यासाठी पात्र करण्यात आली. मोशी येथील कचरा प्रकल्पावर झालेल्या दुर्घटनेत या कपंनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झालेला आहे. असे असताना फक्त भूमि ग्रींची एकच निविदा आधी तर पुढील प्रक्रिया करत येणार नाही म्हणून या अँटोनी लारा कंपनीला पात्र करण्यात आले आहे असे आमचे स्पष्ट मत आहे. निविदा मागवताना स्पर्धा होणार नाही व ठरावीक ठेकेदार पात्र होईल यांची काळजी घेतल्यामुळे निविदा अवास्तव दराने भूमी ग्रीन यांना मिळाली आहे.

सबब सदरील भूमी ग्रीन यांची अत्यंत अवास्तव आणि जास्त दराने आलेली ओल्या व सुक्या कचऱ्याची निविदा तात्काळ रद्द करण्यात यावी. आणि भविष्यात गरज भासल्यास केवळ ओल्या कचऱ्याची स्वतंत्र निविदा मागवण्यात यावी. या गंभीर विषयावर प्रशासानाने तात्काळ चौकशी करून योग्य ती कारवाई करावी ही विनंती

# इथेनॉलयुक्त ई-२० पेट्रोलबाबतच्या धोरणाविरोधात 'टीम भारत'चे देशव्यापी '३एस' आंदोलन




**पुणे :** ई-२० इथेनॉल मिश्रित पेट्रोल अनिवार्य करण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणाविरोधात 'टीम भारत'ने देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. हे धोरण म्हणजे 'देशातील सर्वात मोठा घोटाळा असल्याचा टीम भारतचा आरोप आहे. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत 'सडक, संसद आणि सर्वोच्च न्यायालय' असा आंदोलनाचा पुढील टप्पा असल्याची माहिती संघटनेच्या वतीने तेहसीन पूनावाला व सहकाऱ्यांनी दिली.

पूनावाला यांच्यासह दिनेश तांतिया, विशाल जैन, नचिकेत देशपांडे आणि शंकर रामन या पत्रकार परिषदेला उपस्थित होते. ई-२० धोरणाचा ग्राहक, शेतकरी आणि भारतीय अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांबाबत संघटनेने गंभीर प्रश्न उपस्थित केले.

'सडक'च्या माध्यमातून देशभर जनजागृती आणि नागरिकांशी संपर्क, 'संसद'च्या माध्यमातून आगामी पावसाळी अधिवेशनात खासदारांसमोर हा मुद्दा उपस्थित करणे आणि 'सर्वोच्च न्यायालया'च्या माध्यमातून ग्राहक हक्कांच्या संरक्षणासाठी योग्य कायदेशीर मार्गाचा अवलंब करणे, या तीन बाबींचा टीम भारतच्या आंदोलनात समावेश आहे.

भारतातील रस्त्यांवर धावणाऱ्या ८० टक्क्यांहून अधिक वाहनांची रचना ई-१० इंधनासाठी अनुकूल आहे. तरीही ग्राहकांना निवडस्वातंत्र्य न देता ई-२० पेट्रोलची सक्ती करण्यात येत असल्याचा आरोप 'टीम भारत'ने केला. इथेनॉल धोरणाचा लाभ काही मोजक्या डिस्टिलरी मालकांना झाला असून, ग्राहक आणि शेतकऱ्यांना अपेक्षित फायदे मिळाले नसल्याचा दावाही पूनावाला यांनी केला.

परकीय चलनाची बचत होत असल्याच्या सरकारी दाव्यांवर संघटनेने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. भारत एकीकडे इंधनाची आयात करत असताना दुसरीकडे अन्नपिके आणि कृषी उत्पादनांचा इथेनॉल निर्मितीसाठी वापर केला जात आहे. यामुळे अन्नसुरक्षेवर परिणाम होऊन अन्नधान्याच्या किमती वाढण्यास हातभार लागला असण्याची शक्यता पूनावाला यांनी व्यक्त केली.

ई-२० धोरणासंदर्भातील तांत्रिक अभ्यास, चाचणी अहवाल, पर्यावरणीय मूल्यांकन, आरोग्यविषयक परिणामांचे अध्ययन आणि आर्थिक विश्लेषण सरकारने अद्याप सार्वजनिक केले नसल्याचा आरोपही करण्यात आला. इथेनॉल मिश्रण वाढवल्याने उत्सर्जन, हवेची गुणवत्ता आणि सार्वजनिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबतची सर्व वैज्ञानिक माहिती सार्वजनिक करण्याची मागणी संघटनेने केली.

संघटनेने सरकारसमोर पाच प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. ई-१० अनुरूप वाहनांसाठी ई-१० पेट्रोल उपलब्ध ठेवावे, ई-० पेट्रोलच्या किमतीत कपात करून ग्राहकांना खऱ्या अर्थाने इंधन निवडीचा अधिकार द्यावा, तसेच ई-२० पेट्रोलच्या किमतीत इथेनॉलच्या प्रमाणानुसार २० टक्के सवलत द्यावी, या टीम भारतच्या मागण्या आहेत.

### गडकरी यांच्या आग्रही भूमिकेची चौकशी व्हावी

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या इथेनॉल धोरणाच्या समर्थनामागील संशयास्पद हितसंबंधांची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणीही पूनावाला यांनी केली. तसेच 'टीम भारत' इथेनॉल किंवा नवीकरणीय इंधनांच्या विरोधात नाही. भारताची ऊर्जा सुरक्षा मजबूत करणे आणि कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याच्या प्रयत्नांना संघटनेचा पाठिंबा आहे. मात्र, कोणताही निर्णय वैज्ञानिक पुरावे, पारदर्शकता, ग्राहकांची निवड आणि व्यापक सार्वजनिक चर्चेच्या आधारेच घेतला पाहिजे, अशी भूमिका संघटनेने मांडली.

# विद्यापीठांनी शिक्षणासह कौशल्यांचे एकत्रिकरण करणे आवश्यक - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

## विद्यापीठांना रोजगार देणारे पदवीधर निर्माण करण्याचे राज्यपालांचे आवाहन

**पुणे :** कृत्रिम बुद्धीमत्ता, डेटा सायन्स, रोबोटिक्स, क्वांटम तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा आणि स्वच्छ ऊर्जेमुळे जागतिक अर्थव्यवस्थेत बदल घडून येत आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना केवळ आजच्या नोकऱ्यांसाठीच नाही, तर भविष्यात निर्माण होणाऱ्या संधीसाठी तयार करावे. शिक्षणासोबत कौशल्यांचे एकत्रिकरण अत्यंत महत्त्वाचे असून त्या माध्यमातून रोजगार देणारे पदवीधर निर्माण करावे, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

डिजीआयआय १०० एक्स महाराष्ट्र,पुणे संवादच्या व सिम्बायोसिस इंटरनॅशनल विद्यापीठाच्या (अभिमत विद्यापीठ) सहकार्याने हॉटेल हयात येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमास उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार आणि मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, सिम्बायोसिस सोसायटीच्या प्रधान संचालिका आणि सिम्बायोसिस इंटरनॅशनल विद्यापीठाच्या प्र-कुलपती डॉ.विद्या येरवडेकर, उच्च शिक्षण विभागाचे अप्पर सचिव, आनंदराव पाटील, राज्यपालांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, टाटा प्रोजेक्ट्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक रत्नाकर पै, टड इंडिया अध्यक्ष आणि धोरणात्मक व आंतरराष्ट्रीय सहभागचे उपाध्यक्ष डॉ.अश्विन फर्नांडिस, डिजीआयआय चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिका हेमंत सहल आदी उपस्थित होते.

राज्यपाल वर्मा म्हणाले, विद्यापीठांनी कौशल्य-आधारित अभ्यासक्रम सुरू करावेत आणि विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेला चालना देण्यासाठी या इनक्युबेशन केंद्रांचा लाभ घ्यावा. असे प्रत्येक विद्यापीठ परिसर नाविन्यतेचे केंद्र बनावे, जिथे विद्यार्थी रोजगार शोधणारे नव्हे तर देणारे पदवीधर होतील. रोजगार क्षमतेवर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. प्रत्येक पदवीधराने पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्यापूर्वी अर्थपूर्ण कामाचा अनुभव घेणे आवश्यक आहे. जोपर्यंत आपले पदवीधर रोजगारक्षम होत नाहीत, तोपर्यंत भारताकडे असलेल्या युवा लोकसंख्येचा आपण पूर्ण फायदा उठवू शकत नाही.

महाराष्ट्राला प्रगल्भ सांस्कृतिक आणि नागरी वारसा लाभला असल्याचे सांगून राज्यपाल म्हणाले, राज्यात पर्यटनाची



प्रचंड क्षमता आहे. वारसा जतन, सांस्कृतिक संवर्धन, पायाभूत सुविधा आणि डिजिटल पोहोच यांचे प्रभावी एकत्रीकरण केले, तर पर्यटन हे रोजगार आणि आर्थिक विकासाचे एक प्रमुख इंजिन बनू शकते. त्यासाठी विद्यापीठे संशोधन, दस्तऐवजीकरण, वारसा व्यवस्थापन, पर्यटन अभ्यास आणि सामुदायिक सहभागाच्या माध्यमातून यामध्ये योगदान देऊ शकतात.

आपल्या पारंपारिक कला, हस्तकला, लोकपरंपरा, स्थानिक खाद्यसंस्कृती, कृषी विविधता यांचे जतन करणे आणि कृषी-पर्यटनाला (अ‍ॅग्रो-टूरिझम) चालना देण्यातून हजारो शाश्वत उपजीविका निर्माण होऊ शकतात. लोकभवनने नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या अनेक पारंपारिक कलाप्रकार शोधून त्यांचे जतन करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. हा समृद्ध सांस्कृतिक वारसा सुरक्षित ठेवणे ही भावी पिढ्यांसाठी ही आपली जबाबदारी आहे, असेही त्यांनी सांगितले.

पुण्याने अनेक पिढ्यांपासून भारताची एक प्रमुख 'थिंक टँक' (विचारवंत केंद्र) म्हणून भूमिका बजावली आहे. हे शिक्षण आणि बौद्धिक नेतृत्वाचे सर्वात महत्त्वाचे केंद्र राहिले आहे. या ठिकाणी डिजीआयआय १०० एक्स सारख्या उपक्रमांमध्ये झालेल्या चर्चेचे रूपांतर अशा कृतीशील कल्पनांमध्ये होईल, ज्या केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील उच्च शिक्षण व्यवस्थेला बळकट करतील, असा विश्वासही श्री.वर्मा यांनी यावेळी व्यक्त केला.

ते म्हणाले, उच्च शिक्षणामध्ये अधिक सुलभता, परवडणारी क्षमता, गुणवत्ता आणि उत्कृष्टता सुनिश्चित करणे ही आपली पहिली जबाबदारी आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थी तसेच मुलींना शिक्षण सुरू ठेवण्यासाठी विशेष प्रोत्साहन दिले पाहिजे. उच्च शिक्षणामध्ये महाराष्ट्राने ५० टक्क्यांहून ग्रॉस एन्लरॉलमेंट रेशो साध्य करणारे भारतातील पहिले राज्य बनावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

नवी मुंबईत एक 'इंटरनॅशनल एज्युसिटी' उभारले जात आहे. हे एक एकात्मिक शैक्षणिक शहर असेल, ज्यामध्ये जागतिक दर्जाच्या शैक्षणिक पायाभूत सुविधा, संशोधन केंद्रे, नाविन्यता केंद्रे आणि विद्यार्थी निवासासोबतच आघाडीच्या परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस असतील, असे सांगून राज्यपाल जिष्णू वर्मा म्हणाले, यामुळे आपल्या विद्यार्थ्यांना देशातच जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त पदव्या मिळवता येतील, संशोधन आणि नाविन्यतेला चालना मिळेल आणि उच्च शिक्षणासाठी महाराष्ट्र हे एक जागतिक डेस्टिनेशन म्हणून स्थापित होईल.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, आपली विद्यापीठे पारंपारिक पद्धतीनेच वर्षानुवर्षे शिकवत राहिली तर देशाची प्रगती होणार नाही. देशाच्या प्रगतीसाठी तरुणांच्या हाताला काम मिळाले पाहिजे. त्यासाठी उद्योगजगताला आवश्यक असणारे कौशल्यपूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना द्यावे लागेल. त्यादृष्टीने डीजीने आयोजित केलेले विचारमंथन उपयुक्त आहे. यातून निर्माण होणार आराखडा अंमलबजावणीसाठी पाठपुरावा होणे ही आवश्यक आहे.

महाराष्ट्रात उत्तम उद्दिष्ट असलेल्या संस्थांना खासगी विद्यापीठ (प्रायव्हेट युनिव्हर्सिटी) म्हणून परवानगी महाराष्ट्र शासन देत आहे. मात्र शिक्षणाचे आणि शिक्षण पध्दतीचे सिहांवलोकन होणे आवश्यक आहे. खाजगी विद्यापीठांनी अधिक आधुनिक शिक्षण पद्धतीचा अवलंब करणे काळाची गरज आहे. देशाची आवश्यकता, जगाची आवश्यकता ओळखून पारंपरिक शिक्षणापेक्षा विकासाचा स्वीकारला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

आनंदराव पाटील म्हणाले, उद्योग आणि शिक्षण क्षेत्र यांचा समन्वय फार महत्त्वाचा आहे. भारत सरकार तसेच महाराष्ट्रासह सर्व राज्य सरकारे यावर काम करत आहेत. याचाच भाग म्हणून नॅशनल अप्रेंटिसशिप स्कीम आखण्यात आली आहे. गेल्या वर्षी सुमारे ५ लाख विद्यार्थ्यांना इंडस्ट्रीमध्ये अप्रेंटिसशिप मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रवीण परदेशी म्हणाले, 'महाराष्ट्र इन्स्टिटयूशन ऑफ ट्रान्सफॉर्मेशन' (MITRA) च्या बैठकीत राज्यपाल महोदयांनी किमान मुंबई युनिव्हर्सिटी जागतिक क्रमवारीत पहिल्या १०० मध्ये आली पाहिजे असे निर्देश दिले आहेत. मुंबई, पुणे युनिव्हर्सिटी, सीओईपी, नागपूर आणि अमरावती विद्यापीठ येथे एक उच्च क्षमता केंद्र स्थापन केले आहे. हे केंद्र जगातील सर्वोत्तम विद्यापीठांची स्पर्धा करू शकेल अशा विविध बाबींवर काम करीत आहे. यात रोजगार हा महत्वाचा घटक आहे. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन ऑफ ट्रान्सफॉर्मेशन लक्ष केंद्रित करत आहे. पुढील २-३ वर्षांत राज्यातील किमान ६ विद्यापीठे जागतिक क्रमवारीत आणण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

विनायक पै यांनीदेखील यावेळी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विद्या येरवडेकर यांनी केले. कार्यक्रमाला विविध नामवंत शिक्षण संस्थातील तज्ज्ञ उपस्थित होते.

# ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी व अनुसूचित जाती-जमातीतील अत्याचार पीडितांसाठी पोलीस ठाण्यांमध्ये नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती

**पुणे :** ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी नागरिक तसेच अनुसूचित जाती-जमातीवरील अत्याचारपीडित नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निवारण करण्यासाठी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड शहर आणि पुणे ग्रामीण परिसरातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला.

नियुक्त नोडल अधिकारी संबंधित नागरिकांच्या तक्रारी नोंदवून त्यावर आवश्यक ती कार्यवाही करतील. तसेच या नागरिकांना पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविताना अडचणी येऊ नयेत आणि त्यांच्याशी सन्मानपूर्वक वागणूक मिळावी, यासाठी ही व्यवस्था करण्यात आली आहे.

ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी नागरिक तसेच अनुसूचित जाती-जमातीवरील अत्याचारपीडित नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, पुणे विशाल लोंढे यांनी केले आहे.

# राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या निधी योजनांसाठी २१ ऑगस्टपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**पुणे :** भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या सन २०२६-२७ मधील समान व असमान निधी योजनांचा लाभ घेण्यासाठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. इमारत बांधकाम व विस्तार, ग्रंथालयांचे आधुनिकीकरण, 'ज्ञान कोपरा' व 'बालकोपरा' विकसित करणे, महोत्सवी वर्ष साजरे करणे तसेच चर्चासत्र, कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी अर्थसहाय्य या योजनांचा यात समावेश आहे.

इच्छुक ग्रंथालयांनी विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह इंग्रजी किंवा हिंदी भाषेत चार प्रती संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे २१ ऑगस्ट २०२६ पर्यंत सादर कराव्यात. तसेच प्रस्ताव राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या ऑनलाइन प्रणालीद्वारेही सादर करावेत. योजनांची सविस्तर माहिती, नियम व अर्जाचा नमुना www.rrrlf.gov.inG$ या संकेतस्थळावर उपलब्ध असून अधिक माहितीसाठी संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.


## सा.संघर्षाचा आवाज तेरावा वर्धापण विशेषांक

संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देणारे गौतम बुध्द, छत्रपती शिवराय, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व आण्णाभाऊ साठे या चळवळीशी सामाजिक व राष्ट्रीय बांधिलकी जपत लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाशी इमान राखत आणि प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधत आतापर्यंतचा प्रवास केला आहे. बहुजन समाजाचे मुखपत्र म्हणून सा.संघर्षाचा आवाजास २६ जुलैला १३ वर्षे पुर्ण होत आहे. तर सा.संघर्षाचा आवाज २७ जुलै २०२६ रोजी चौदाव्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्ताने 'सा. संघर्षाचा आवाज तेरावा वर्धापण विशेषांक' २७ जुलै २०२६ ला प्रकाशित करणार आहोत. या वर्धापण दिनानिमित्त विशेषांकाचे कामकाज चालू आहे. तरी वाचक, हितचिंतक, देणगीदार, जाहिरातदार व मान्यवरांनी आपली व आपल्या फर्म, व्यवसाय, संघटना आदींची जाहिरात देऊन सहकार्य करावे. सा.संघर्षाचा आवाजास नेहमी करीत असलेल्या सहकार्याबद्दल आम्ही आपले सदैव आभारी आहोत.

जाहिरातीसाठी संपर्क :- ७२७६८७१००८, ९६६५४८७१३४